# (असाधारण)
## अधिसूचना

क्रमांक : १९७/२०२५. दिनांकः १४/१०/२०२५.

**विषय :- समायोजनाबाबत.**

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार, खालील एन.ई.पी. २०२० या परीक्षा पध्दतीच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या परीक्षा पध्दती जसे, Annual Pattern, CGS, Old C.B.C.S., C.B.C.S. यामध्ये प्रथम तसेच द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ज्याचे संपूर्ण विवरण खालील कोष्टकांत नमूद केले आहे, त्या विद्यार्थ्यांना, कोष्टकाच्या खाली सविस्तर नमूद केल्याप्रमाणे समायोजना प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | समायोजन/प्रवेश |
|---|---|---|
| | **पदवी** | |
| १) | Annual Pattern, CGS Pattern, CBCS Pattern - I Year पूर्णपणे उत्तीर्ण | NEP (UG)-II Year, III Semester |
| २) | Annual Pattern, CGS Pattern - II Year पूर्णपणे उत्तीर्ण | CBCS-III Year Semester- V |
| ३) | Annual Pattern, CGS Pattern, C.B.C.S. Pattern-II Year पूर्णपणे उत्तीर्ण | NEP (UG)-III Year , V Semester **( शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून लागू )** |
| | **पदव्युत्तर** | |
| १) | Annual Pattern, CGS Pattern, Old CBCS, New CBCS Pattern I Year पूर्णपणे उत्तीर्ण | NEP (PG)-II Year, III Semester |

**पदवी विद्यार्थ्यांकरीता** :- **अ.** NEP -2020 या परीक्षा पध्दतीच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या परीक्षा पध्दती जसे, Annual Pattern, CGS, CBCS etc. यामध्ये प्रथम व द्वितीय वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गात म्हणजेच NEP -2020 या परीक्षा पध्दतीत अनुक्रमे द्वितीय व तृतीय वर्षात (शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून लागू ) म्हणजेच सत्र ३ व ५ ला प्रवेश देतेवेळी त्याला डिग्रीसाठी पात्र होण्याकरीता नवीन योजनेमधील म्हणजेच NEP-2020 मधील Vertical C to F मधील विषय ज्या वर्गात त्याला प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या वर्गाच्या अगोदरच्या वर्गाचे नवीन योजनेतील म्हणजेच NEP -2020 या परीक्षा पध्दतीतील विषय महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा देऊन उत्तीर्ण करावे लागतील. उदा :- Annual Pattern मधील प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण विद्यार्थ्याला NEP-2020 या परीक्षा योजनेतील, द्वितीय वर्ष, तिस-या सत्रात प्रवेश देते वेळी, NEP-2020 या परीक्षा योजनेतील पहिल्या व दुस-या सत्रातील Vertical C to F मधील विषय महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा देऊन उत्तीर्ण करावे लागतील व CGPA ची गणना करते वेळी त्याला Annual Pattern मधील प्रथम वर्षासाठी ४४ श्रेयांक घ्यावे लागतील. अशा पद्धतीने CGS/CBCS साठी सुद्धा CGPA ची गणना करण्यात यावी.

**ब.** शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ हे CBCS परीक्षा पध्दतीतील शेवटचे वर्ष आहे, त्यामुळे CBCS परीक्षा पध्दतीपूर्वीच्या परीक्षा योजनेतील जसे, Annual Pattern, CGS etc. मधील प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना , CBCS परीक्षा योजनेतील सत्र – ५ ला प्रवेश देतेवेळी DSC व DSE हे विषय विद्यार्थ्यांना जुन्या योजनेतील विषयांपैकी घेणे अनिवार्य राहील व त्या विषयाचा अभ्यासक्रम CBCS प्रमाणे राहील. तसेच CBCS योजनेत अगोदरच्या विद्यार्थ्यांना CBCS सत्र १ ते ४ मध्ये असलेले DSC व DSE हे विषय वगळून, ईतर विषयाची परीक्षा, उदाहरणार्थ – GOEC etc. महाविद्यालयीन पातळीवर होणा-या परीक्षेद्वारे, विद्यापीठाचे परीक्षा आवेदन पत्र भरुन उत्तीर्ण करावी लागेल. त्याशिवाय त्यांना सत्र – ६ ची गुणपत्रिका देण्यात येणार नाही. CBCS योजनेमध्ये, CBCS अगोदरच्या विद्यार्थ्यांच्या CGPA ची गणना सहाव्या सत्राला करतेवेळी, १ ते ४ सत्रांमध्ये CBCS योजनेतील श्रेयांक, जुन्या विद्यार्थ्याकरिता सत्रनिहाय जसेच्या तसे घ्यावेत.

**क. पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरीता** :- जुन्या योजनांतील जसे- Annual, Semester,CGS व CBCS प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना NEP-2020 या परीक्षा योजनेमध्ये द्वितीय वर्ष म्हणजेच तिस-या सत्राला प्रवेश दिल्यानंतर, त्यांचे चवथे सेमिस्टर पूर्ण करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी NEP-2020 मधील सेमिस्टर एक आणि दोन मिळून असे एकूण ४२/४४ क्रेडीटस ची पूर्तता करणे गरजेचे आहे. (OJT-60 Hours – 02 Credits/120 Hours – 04 Credits ) त्याकरीता प्रथम आणि द्वितीय सत्रासाठी असलेले Research Methodology आणि IPR, OJT/Field Project, Tutorial या शिर्षकांची परीक्षा क्रेडीट पूर्ण करण्याकरीता द्यावी लागेल. या शिर्षकांची परीक्षा देऊनही सुध्दा क्रेडीटस ची पूर्तता होत नसेल, तर विद्यार्थ्यांना NEP-2020 पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सेमिस्टर एक व दोन मधील कुठल्याही नवीन असलेल्या ( म्हणजेच जुन्या अभ्यासक्रमातील नसलेला ) विषयाची परीक्षा देऊन ४२ क्रेडीटसची पूर्तता करणे बंधनकारक राहील. त्याकरीता विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे परीक्षा आवेदन पत्र भरावे लागतील व ही परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. CGPA ची गणना करतेवेळी NEP-2020 प्रथम/द्वितीय सत्रासाठी असलेले श्रेयांक विद्यार्थ्याला देऊन व जुन्या योजनेतील श्रेयांक वगळून CGPA ची गणना चवथ्या सत्रामध्ये करण्यात यावी.

१) यासंदर्भातील कार्यान्वित अधिसूचना क्रमांक ७८/२०२४, दिनांक १६.०७.२०२४, १५२/२०२४, दिनांक ११.११.२०२४, १५३/२०२४, दिनांक ११.११.२०२४, १०/२०२५, दिनांक ०७.०१.२०२५, १४१/२०२५, दिनांक २८.०८.२०२५, यान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२) सदर समायोजन शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून लागू करण्यात यावे.

स्वा/-
**(डॉ. अविनाश असनारे)**
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
अमरावती.

**************